# बृहन्मुंबई महानगरपालिका

कार्यकारी अभियंता संनियंत्रण व नोंदणी कक्ष यांचे कार्यालय, जे.बी.शाह म्युनिसिपल मार्केट बिल्डिंग,
पहिला मजला, युसुफ मेहर अली रोड, मस्जिद (पश्चिम), मुंबई-४००००९.

क्र.का.अ./संनि.व नों./६७७/ स्थापत्य दि:- २२.०६.२०२६

**परिपत्रक**

**विषय :-** पिण्याच्या पाण्याच्या भूमिगत व इमारतीच्या गच्चीवरील (Overhead) टाक्यांची स्वच्छता व निर्जतुकीकरण करण्याबाबत तसेच सदर कामासाठी खाजगी कंत्राटदारांचे नोंदणीकरण करण्याबाबत.

**संदर्भ :-** क्र. एमजीसी/एफ/०७८० दिनांक ०१.०६.२०२६.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, महानगरपालिका विश्लेषक प्रयोगशाळा यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार पिण्याच्या पाण्याच्या भूमिगत व इमारतीच्या गच्चीवरील (Overhead) टाक्यांची स्वच्छता व निर्जतुकीकरण करण्यासाठी खाजगी कंत्राटदारांचे नोंदणीकरण कार्यकारी अभियंता (संनियंत्रण व नोंदणी) कक्ष यांच्या मार्फत करण्यास स्थायी समितीने ठराव क्र. १४२६, दिनांक १८.०२.२०२१ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

त्याअनुषंगाने, या विभागामार्फत धोरणात्मक प्रस्ताव मा.महानगरपालिका आयुक्त यांच्या मंजुरी करिता सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास मा.महानगरपालिका आयुक्त यांची क्र. एमजीसी/ एफ/ ०७८० दि.०१.०६.२०२६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्याअनुषंगाने पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांची स्वच्छता, निर्जतुकीकरण व संबंधित कंत्राटदारांच्या नोंदणीसंदर्भातील मार्गदर्शक धोरण खालीलप्रमाणे आहे.

**१.<u>पाण्याच्या टाक्यांची स्वच्छता व निर्जतुकीकरण</u>**

**(अ)स्वच्छता प्रक्रिया**

अ) सर्वप्रथम पाण्याच्या टाकीतील पाणी झडपा (Valves) अथवा नळ उघडून टाकी पूर्णपणे रिकामी करण्यात यावी.

आ) टाकीच्या भिंतींवरील शेवाळ, गाळ व इतर घाण क्लोरीनयुक्त द्रावणाचा वापर करून जाड ब्रश किंवा हाय-प्रेशर जेट मशीनच्या साहाय्याने काढून टाकावी.

इ) टाकीमध्ये प्रत्यक्ष उतरून स्वच्छता करणे शक्य नसल्यास लांब दांड्याच्या ब्रशचा वापर करावा.

ई) टाकीतील गाळ, शेवाळ किंवा इतर साचलेला कचरा आउटलेट व्हॉल्व्हद्वारे बाहेर काढावा. आउटलेट व्हॉल्व्ह उपलब्ध नसल्यास सक्शन पंपाचा वापर करावा.

**(ब)निर्जंतुकीकरण प्रक्रिया**

अ) स्वच्छता पूर्ण झाल्यानंतर टाकीच्या आतील भिंती व तळावर क्लोरीन पावडर अथवा क्लोरीनयुक्त द्रव्याची फवारणी करावी.

आ) त्यानंतर टाकी किमान एक तास बंद ठेवावी व नंतर स्वच्छ पाण्याने धुऊन घ्यावी.

इ) पाण्याच्या टाक्यांची स्वच्छता व निर्जंतुकीकरण वर्षातून किमान दोन वेळा करणे बंधनकारक राहील.

ई) प्रत्येक स्वच्छतेनंतर टाकीतील पाण्याचा सीलबंद नमुना संस्थेच्या पदाधिका-यांच्या स्वाक्षरीसह बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जी/उत्तर विभागातील प्रयोगशाळेत रासायनिक व सूक्ष्मजीवशास्त्रीय (Microbiological) तपासणीसाठी विहित शुल्कासह सादर करावा.

उ) स्वच्छतेसाठी वापरण्यात येणारी क्लोरीन पावडर अथवा रसायने ISO/FDA प्रमाणित असणे आवश्यक राहील.

**१. <u>कंत्राटदार नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे</u>**

**बृहन्मुंबई महानगरपालिकेत पाण्याच्या टाक्या स्वच्छ करण्याकरिता इच्छूक कंत्राटदार खालील कागदपत्रांची पूर्तता करून महानगरपालिकेत नोंदणी करू शकतील.**

१. पाण्याच्या टाक्यांच्या स्वच्छतेचा किमान तीन वर्षांचा अनुभव असल्याचे प्रमाणपत्र.

२. पाण्याच्या टाक्या स्वच्छ करण्याच्या कामासाठी नियुक्त पर्यवेक्षक (Supervisor) याने विज्ञान शाखेतून इयत्ता १२ वी उत्तीर्ण केलेली असल्याचे प्रमाणपत्र.

३. कंत्राटदाराच्या मालकीचे जेट मशीन व सबमर्सिबल पंप असल्याचे खरेदी बिल.

- जेट मशीनची क्षमता किमान ३० बार व कमाल २०० बार असावी.
- सबमर्सिबल पंपाची क्षमता किमान १ एच.पी. असावी.
- टाकीची क्षमता व संरचनात्मक स्थिती (Structural Condition) लक्षात घेऊन सदर उपकरणे वापरण्याचा अनुभव असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

४. स्वच्छतेचे काम करणा-या कर्मचा-यांना सुरक्षा साहित्य (हातमोजे, सुरक्षा बूट, हेल्मेट, आवश्यकतेनुसार ऑक्सिजन मास्क इ.) पुरविण्याबाबत तसेच नोंदणीवेळी सादर केलेली माहिती व कागदपत्रे अचूक असल्याबाबत रु. ५००/- च्या मुद्रांक पत्रावर (Stamp Paper) हमीपत्र सादर करणे आवश्यक राहील.

५. कंत्राटदाराकडून नियुक्त कर्मचा-यांना कोणताही संसर्गजन्य आजार नसल्याबाबत नोंदणीकृत वैद्यकीय अधिका-यांचे प्रमाणपत्र.

६. कंत्राटदाराचे आयकर ओळखपत्र (पॅन कार्ड) व आधार कार्डाची प्रत.

वरील सर्व अटींची पूर्तता करणा-या इच्छुक कंत्राटदारांची स्थायी समिती ठराव क्र. १४२६,दिनांक १८.०२.२०२१ अन्वये कार्यकारी अभियंता (संनियंत्रण व नोंदणी) कक्षामार्फत नोंदणी करण्यात येईल. नोंदणीकृत कंत्राटदारांची यादी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**३.नोंदणीचा वर्ग व नूतनीकरण**

अ) पात्र कंत्राटदारांची नोंदणी "ई" वर्ग (Class-E) कंत्राटदार म्हणून करण्यात येईल.

आ) नोंदणी प्रमाणपत्राची वैधता ५ (पाच) वर्षे राहील.

इ) वैधता संपल्यानंतर विहित शुल्क भरून नोंदणीचे नूतनीकरण करणे बंधनकारक राहील.

**४. तंटा निवारण**

काम देणारे खाते व पाण्याच्या टाक्यांची स्वच्छता करणारा कंत्राटदार यांच्यामध्ये कोणताही तंटा उद्भवल्यास संबंधित विभागाचे प्रमुख अभियंता / संचालक (अभियांत्रिकी सेवा व प्रकल्प) / सहाय्यक आयुक्त / अतिरिक्त आयुक्त / मा. महानगरपालिका आयुक्त यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

तसेच कंत्राटदारास सर्वसाधारण कंत्राट अटी व शर्ती (GCC),बृहन्मुंबई महानगरपालिका कंत्राटदार नोंदणी नियमावली-२०१६,मुंबई महानगरपालिका अधिनियम-१८८८ (MMC Act) तसेच मानक बोली दस्तऐवज (SBD) मधील तरतुदी लागू राहतील.

**५. नोंदणी व नूतनीकरण शुल्क**

| अ. क्र. | वर्ग | नोंदणी / नूतनीकरण शुल्क |
|---|---|---|
| १ | वर्ग 'ई' | रु. ५,७८०/- |

सदर शुल्कामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणानुसार दरवर्षी १०% वाढ लागू राहील.

सही /- २२.०६.२०२६
कार्यकारी अभियंता
(संनियंत्रण व नोंदणी) कक्ष